# अधिसूचना

**(भूसंपादन अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०)मधील कलम ११ अन्वये )**

**क्र. २०१७/भूसं/मा.प्र/सिआर/०२**
उपजिल्हाधिकारी भूसंपादन मांजरा प्रकल्प
उस्मानाबाद यांचे कार्यालय,
दिनांकः- /०५/२०१७

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३

ज्याअर्थी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना , महसूल व वन विभाग शासन अधिसुचना क्र. MIS-११/२०१४/CR-७७(PART-२)/A-२ DATED ११/०९/२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे ) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील १०,००० हेक्टर अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या उस्मानाबाद जिल्हाच्या जिल्हाधिका-यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमिनीच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त जमिन असा करण्यात आला आहे) संपादनाची कार्यवाही ही सार्वजनिक प्रयोजनासाठी (या यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणूनच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (०१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (सदर प्रकल्पात कोणत्याही व्यक्तीचे विस्थापन होणार नाही).

ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (०१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (सदर प्रकल्पात पुनर्वसन व पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही.)

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकार-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्तर उल्लंघन केल्यास त्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (०५) नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क नियम महाराष्ट्र २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (०३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनिमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मांजरा प्रकल्प उस्मानाबाद , जिल्हा उस्मानाबाद यांस पदनिर्देशित करीत आहे.

**(प्रभोदय मुळे)**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन**
**मांजरा प्रकल्प .उस्मानाबाद**

# अनुसूची एक

जमिनीची वर्णन

गाव - दहिवाडी तालुका:- तुळजापूर जिल्हा:-उस्मानाबाद

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे.आर मध्ये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | ३०८ | ०.५८ |

(प्रभोदय मुळे)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
मांजरा प्रकल्प .उस्मानाबाद

## अनुसूची २

## सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण.

**प्रकल्पाचे नांव :-** कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना टप्पा क्र. ०२ अंतर्गत टप्पा क्र. ०३ पांगरधरवाडी सिंचन तलाव उंची वाढीसाठी

**प्रकल्पाचे वर्णन:-** कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजनेअंतर्गत कृष्णा खो-यातील मराठवाडयाच्या हिश्याचे २३.६६ अब्ज घनफुट पाणी अवर्षण प्रवणग्रस्त उस्मानाबाद जिल्हयास उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :-** संपादन क्षेत्र मौ. दहिवाडी ता. तुळजापुर या गावातील शीवारामधून जात असून मराठवाडयाच्या हिश्याचे २३.६६ अब्ज घनफुट पाण्यापैकी उपसा सिंचन योजना क्र. ०२ साठी ७.५७ घनफुट पाण्याची तरतुद असून त्यापैकी प्रथम टप्प्याद्वारे उपलब्ध झालेल्या २.२४ अब्ज घनफुट पाणी वापरातुन एकुण १०,८६२ हे. आर. जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्याचा लाभ सदर गावातील शेतक-यांना होणार आहे. त्यामुळे संबंधीत शेतक-यांचे जिवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

## अनुसूची तीन

## बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

सदरच्या भूसंपादन प्रक्रीयेमुळे सदरील गावातील कोणतीही व्यक्ती/कुटुंब सद्यस्थितीमध्ये विस्थापीत होत नाहीत.

## अनुसूची चार

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)**

सदरच्या प्रकरणी भूसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतुदींनुसार कृष्णा मराठवाडा उपसासिंचन योजना क्र.०२ अंतर्गत टप्प क्र. ०३ मधील पांगरधरवाडी सिंचन तलावाचे काम जवळपास ९५ % पुर्ण झालेले आहे. संपादित क्षेत्रातील भूसंपादन क्षेत्राचा भाग - १ व भाग - २ व भाग - ३ व भाग - २ मधील अतिरिक्त गट नं २७७ , २७८ मधील संबधित शेतक-यांना अंतिम निवाडयानुसार मावेजा वाटप करण्यात आलेला आहे गट क्र. ३०८ मधील संबधित शेतक-याच्या विनंती अर्जानुसार फेर संयुक्त मोजणी केली असता ०.५८ हे. आर क्षेत्र अतिरिक्त संपादित होत असल्याने नविन भूसंपादन कायदा २०१३ अन्वये संपदित संस्था यांनी सादर केलेला भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी , उस्मानाबाद यांचे आदेश दि. ०५/०४/२०१७ अन्वये या कार्यालयास भूसंपादनाची प्रक्रीया करणेबाबत आदेशीत केलेले आहे. संबंधीत संपादन संस्थेने यापुर्वीच खाजगी वाटाघाटीने अनुसुची एक मधील जमीनींचा ताबा परस्पर दि. ०२/०७/२०१३ रोजी घेतलेला असल्यामुळे सदरच्या प्रकरणी सामाजिक आघात निर्धारण अभ्यास करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची पाच .

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

**अ -** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम-लागू नाही

**ब -** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता लागू नाही

**ग-** ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील लागू नाही.

**टिप :-** **१)** सदर प्रकल्पासाठी होणाऱ्या भूसंपादनामुळे कुठल्याही व्यक्तीचे पुनर्वसन करण्याची आवश्कता नाही,त्यामुळे अधिनियम ४३ अन्वये प्रशासकाची नियुक्ती केलेली नाही.

२) उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन मांजरा प्रकल्प , उस्मानाबाद यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायदयाचे कलम ११ चे उप कलम ०१ खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत **उपजिल्हाधिकारी भूसंपादन , मांजरा प्रकल्प उस्मानाबाद** यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**दिनांक:** **/०५/२०१७**

**ठिकाण: उस्मानाबाद**

**(प्रभोदय मुळे)**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन**
**मांजरा प्रकल्प .उस्मानाबाद**